# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क. ७१६/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यलय, भंडारा
दिनांक ३०/१०/२०१६

**१) गोडाऊनच्या दाराचा ताला तोडुन आत प्रवेश करुन जेसीपी व ट्रक्टरचे स्पेअर पार्टची चोरी . :–**

दिनांक २८/१०/२०१६ ते २९/१०/२०१६ चे रात्र दर. यातील कोणीतरी अज्ञात चोराने फिर्यादीचे किरायाचे गोडाऊन चा समोरील दाराचा ताला तोडुन आत प्रवेश करुन त्या मध्ये ठेवलेले जेसीपी व ट्रक्टरचे स्पेअर पार्ट कि. १,८००/–रु. चा माल महर्षी शाळे जवळ तुमसर ते देव्हाळी येथुन चोरुन नेल्याने फिर्यादी पिन्टु इंद्रजित सिंग वय ३६ वर्ष, रा. गांधी वार्ड देव्हाळी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम ४५७,३८० भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. श्रीवास पो.स्टे. तुमसर हे करीत आहेत.

**२) अल्पवयीन मुलगा घरी व रिश्तेदारीत मिळुन न आल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक २६/१०/२०१६ रोजी ११.०० वा. दर. यातील फिर्यादी हा सनफ्लॅग कंपनी मध्ये कामावर गेला कामा वरुन परत आल्यावर त्याचा अल्पवयीन मुलगा अजमेश केशव सेलोकर वय १४ वर्ष, रा. हा घरी दिसुन आला नाही त्याचा रिस्तेदारीत व गावात शोध घेतला असता मिळुन आला नाही त्यास कोणीतरी अज्ञात इसमाने अपहरण केले असावे असे फिर्यादी केशव जसुदेव सेलोकर वय ४० वर्ष, रा. एकलारी यांचे तोंडी व मा. सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश नुसार गुन्हा नोंद करण्यात आला. पोलीस स्टेशन वरठी येथे कलम ३६३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. पटले पो. स्टे. वरठी हे करीत आहेत.

**३) शुल्लक कारणावरुन भांडण करुन लोखंडी रॉडने मारुन जखमी केले. :–**

दिनांक २८/१०/२०१६ रोजी २१.३० वा. दर. यातील फिर्यादी हा पत संस्थेचा ऑफीस बंद करुन राजीव गांधी चौकातुन घरी जात असता यातील दोन्ही आरोपीतांनी संगनमत करुन फिर्यादीस थांबवुन तु माझे वडीला सोबत भांडण का केले या कारणा वरुन आरोपी क्र. १ याने फिर्यादीचे डोक्यावर लोखंडी रॉडने, पायाला, डावे हातावर मारुन जखमी केल्याने फिर्यादी नितीन उर्फ पुष्पेन्द्र रामदर्श मिश्रा वय ३० वर्ष, रा. म्हाळा कॉलोनी भंडारा यांचे व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३२४,३४ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. महालगावे पो. स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**४) शिविगाळ का करतोस या कारणावरुन विट मारुन दुखापत केली . :–**

दिनांक २९/१०/२०१६ रोजी २०.३० वा. दर. यातील फिर्यादी बाबुराव राजाराम सार्वे वय ६० वर्ष, रा. नेहरु वार्ड बेला हे झुलेवाल्या सोबत दुर्गा मंदीर समोर जेवन करीत असतांना यातील आरोपी हा शिविगाळ करीत होता म्हणुन फिर्यादीने कशाला शिविगाळ करतो असे हटकले असता आरोपीने भांडण करुन फिर्यादीचे डावे हाताचे कोणीजवळ विट मारुन दुखापत केल्याने फिर्यादीचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३२४,५०४ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. मोरे पो. स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**५) टिप्परच्या साहीत्याची चोरी . :–**

दिनांक २८+२९/१०/२०१६ रोजी चे रात्र दर. यातील फिर्यादीचे मालकीचा १० चक्का टिप्पर क्र. एमएच ३६ एफ ५३४६ हा दि. २८/१०/२०१६ चे रात्र दर. फिर्यादीचे कार्यालया समोर ऊभा करुन ठेवला असता कोणीतरी अज्ञात चोराने टिप्परचे समोरील चालक बाजुचे लॉक तोडुन बॅटरी २ नग कंपनी एक्साईट, १ स्टेपनी अपोलो डिलक्स टायररसह, १५० लीटर डिजेल, पाने पेन्वीस सेट, हॅड्रोलीक जाक असा एकुण ७८,०००/–रु. चा माल चोरुन नेल्याने फिर्यादी श्रीराम संजयराव पोहरकर वय २६ वर्ष, रा. पुर्व समर्थ नगर लाखनी तर्फे सतिष तानबाजी खेडीकर वय २६ वर्ष, रा. रा. पोहरा यांचे लेखी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम ३७९ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. रामटेके पो. स्टे. लाखनी हे करीत आहेत.

६) मोटार वाहन कायद्याखाली कारवाई. :—

दिनांक ३०/१०/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायद्याखाली ७९ प्रकरणांची नोंद कण्यात आलेली असून त्यापैकी अवैध प्रवासी०२ तसेच तिन सिटर वाहनांवरती ०३ केसेस व ईतर वाहनांवरती ७४केसेस करण्यात आलेल्या आहेत.

प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा करीता
दुरध्वनी.क्र. ९९२१७४१६८१

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.